**सुधारित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम- लोकसहभागाची संकल्पना व कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना - मागणी आधारित व लोकसहभाग आधारित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी सुधारित सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ८ ऑक्टोबर, २००३.**

**वाचा**

१) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००१/प्रक्र-१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१.
२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००२/प्रक्र-५३२/पापु-०७, दिनांक २३ मार्च, २००२.
३) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७, दिनांक २२ ऑगस्ट, २००३.

**प्रस्तावना :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाचे सुधारित धोरण शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९९/प्रक्र-३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २००० अन्वये संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्यात आल्यानंतर या सुधारित धोरणातील लोकसहभागाचे तत्व स्पष्ट करुन त्याअनुषंगाने या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संदर्भीय दिनांक ३.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. या सूधारित मार्गदर्शक सूचनानुसार राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करित असतांना गेल्या दीड वर्षात प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आलेल्या अडचणी, मागणी आधारित लोकसहभागातून पाणी पुरवठ्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी ग्रामस्थांकडून आलेल्या सूचना व पूर्वीच्या अंमलबजावणी यंत्रणा व नव्या धोरणानुसार ज्यांची भूमिका व जबाबदारी आता मार्गदर्शक सहाय्यकारी यंत्रणा अशा स्वरुपाची आहे अशा जिल्हा परिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा या शासकीय अथवा शासन नियंत्रित यंत्रणांकडून प्राप्त माहितीच्या आधारे वरील संदर्भात नमूद शासन आदेशातील काही सूचना व मार्गदर्शक तत्वांमध्ये सूधारणा करणे आवश्यक आहे.

३. राज्यात नवीन मागणी आधारित लोकसहभागाच्या तत्वावर सुरु असलेल्या सर्व कार्यक्रमांसाठी या सूचनांची दुरुस्ती आवश्यक आहे. त्यापैकी जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यासाठी जागतिक बँकेने केलेल्या आणखी काही सूचना विचारात घेऊन संदर्भिय दिनांक ३.९.२००१ च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये काही दुरुस्त्या संदर्भिय क्रमांक ३ येथील दि.२२ ऑगस्ट, २००३ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या दुरुस्त्या फक्त जलस्वराज्य प्रकल्पासाठीच लागू असल्याने राज्यात मागणी आधारित लोकसहभागाच्या तत्वावर राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी संदर्भिय दिनांक ३.९.२००१ च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनांमध्ये काही दुरुस्त्या करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन राज्यामध्ये जागतिक बँक सहाय्यित **"जलस्वराज्य" प्रकल्पा व्यतिरिक्त इतर मागणी आधारित व लोकसहभाग आधारित ग्रामीण पाणी** पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी संदर्भिय **दिनांक ३.९.२००१** च्या शासन निर्णयात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| **अ.क्र** | **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु १००१ /प्र.क्र.१९०/ पापु.०७ दि. ३.९.२००१ च्या परिच्छेद क्रमांक १ मधील उप परिच्छेदामध्ये अस्तित्वात असलेली तरतूद.** | **या उप परिच्छेदात करण्यात आलेली दुरुस्ती** |
|---|---|---|
| १ | (५)(क) योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अभियंत्यांच्या प्रतिस्वाक्षरीनुसार देयके अदा करणे. | (५)(क) अशा प्रतिस्वाक्षरीची आवश्यकता नसून सुविधांच्या/योजनेच्या कामाच्या टप्प्यानुसार कंत्राटदारास देयके अदा करण्याचे संपूर्ण अधिकार ग्रामसभेस अथवा ग्रामसभेने विहीत अटीच्या अधीन राहून अधिकार दिल्यानुसार ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस असतील. कामाची प्रगती व गुणवत्तेचे योग्य त्या टप्प्यावर वेळोवेळी संनियंत्रण व तपासणी करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला असतील. |
| २ | १६) योजना मंजूर झाल्यावर व कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जिल्हा परिषद व कंत्राटदार यांच्यात योजनेच्या प्रत्यक्ष | (१६) ग्रामपंचायतीना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मार्फत पाणी पुरवठा सुविधांची कामे स्वतः मजूर लावून, तंत्रज्ञाच्या सेवा वापरुन व सामुग्री स्वतः खरेदी करुन किंवा काही |

| | | |
|---|---|---|
| | अंमलबजावणीबाबत त्रिपक्षीय करार करण्यात यावा. | तांत्रिकदृष्टया किचकट कामे खुल्या व पारदर्शक पध्दतीने कंत्राटदार लावून व इतर कामे ग्राम पंचायतीला (ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती) स्वत: करुन घेता येतील. हे विविध पर्याय ग्रामसभेपुढे ठेवून त्यातून किफायतशीर खर्चाचा, व्यावहारीक व योग्य पर्याय निवडण्यात यावा.यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती,जिल्हा परिषद व कंत्राटदार अशा त्रिपक्षीय कराराची आवश्यकता नाही. हा करारनामा ग्राम पंचायतीतर्फे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आणि यथास्थिती कंत्राटदार, पुरवठादार किंवा तांत्रिकसेवा पुरवठादार यांच्यातील द्विपक्षीय करार असेल. |
| ३ | (१९) ग्रामसभेने ठराव करुन हे काम ग्रामपंचायतीअंतर्गत करण्याचे ठरविले तर त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-याची परवानगी घ्यावी लागेल. | (१९) ग्रामसभेने हे काम कंत्राट न देता ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समितीकडून विभागातंर्गत (Departmental) करण्याचे ठरविले तर त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-याची परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. |
| ४ | २१) कंत्राटदाराची बिले कामाच्या टप्प्यानुसार अदा करण्याचे अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला असतील. मात्र बिले अदा करण्यापूर्वी जिल्हापरिषदेच्या तांत्रिक अधिका-यांकडून ती तपासून घेवून त्यांची प्रति स्वाक्षरी घेतल्यानंतरच ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती रक्कम धनादेशाद्वारे अदा करेल. बँकेला त्यानुसार जिल्हापरिषदेकडून आगावू सूचना देण्यात याव्यात. | (२१) कंत्राटदारांची बिले कामाच्या टप्प्यानुसार अदा करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला असतील. सदर बिले अदा करण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या तांत्रिक अधिका-यांकडून तपासून घेऊन त्यांची प्रतिस्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.मात्र ग्रामस्तरावर ग्रामसभेने नेमलेल्या **ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समितीची** सहमती लागेल.मात्र, वेळोवेळी आवश्यकतेनुसार स्वतंत्र तपासणी करण्याची जिल्हा परिषदेला मुभा राहील. |
| ५ | (२४) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर **ग्रामसभेने** मान्य केलेल्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी** यांच्या सहया असतील व जिल्हापरिषदेने विहित केलेल्या तांत्रिक अधिका-याची प्रति स्वाक्षरी (Counter Signature) त्यावर राहील. | (२४) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर **ग्रामसभेने** मान्य केलेल्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी** यांच्या सहया असतील (त्यात किमान १ महिला असेल) जिल्हापरिषदेने विहित केलेल्या तांत्रिक अधिका-याची प्रति स्वाक्षरी (Counter Signature) घेण्याची आवश्यकता नाही. |
| ६ | २८) पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या **पूर्णत्वाचा दाखला** गावातील महिला | (२८) पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या **पूर्णत्वाचा दाखला** गावातील महिला मंडळांच्या अथवा |

| | | |
|---|---|---|
| | मंडळांच्या सहमतीनंतरच देण्यात येईल व कंत्राटदाराची अंतिम देयके **ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर** आणि **जिल्हापरिषदेच्या संबंधित तांत्रिक अधिका-यांनी प्रति स्वाक्षरी** केल्यानंतरच अदा करण्यांत यावीत. | ग्रामपंचायतीच्या महिला विकास समितीच्या सहमतीनंतरच देण्यात येईल व कंत्राटदाराचे शेवटचे अंतिम देयक **ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर** अदा करण्यांत यावे. सदर देयक अदा करण्यासाठी **जिल्हापरिषदेच्या संबंधित तांत्रिक अधिका-यांची प्रति स्वाक्षरी** घेण्याची आवश्यकता नाही. |

४. ही दुरुस्ती तात्काळ अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद,(सर्व)
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१४. प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
१६. तहसीलदार, (सर्व)
१७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
१८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१९. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग.जिल्हा परिषद (सर्व)
२०. गट विकास अधिकारी.पंचायत समिती (सर्व)
२१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
२३. मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई.
२४. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
२५. नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई
२६. वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
२७. ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
२८. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
२९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३०. निवडनस्ती पापु०७.

एच-824(5000-10-03)2अ.